रविवार सातारा, २६ फेब्रुवारी २०१७ । किंमत ₹ ४
सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

## कोरेगावमधील बारावी परीक्षा बैठक व्यवस्था

कोरेगाव, ता. २५ : मंगळवारपासून (ता. २८) सुरू होत असलेल्या बारावीच्या परीक्षेसाठीची बैठक व्यवस्था येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील मुख्य केंद्रावर व मॉडर्न हायस्कूलमधील उपकेंद्रावर केली आहे. कला विभागाची इंग्रजी व मराठी विषयांची परीक्षा अनुक्रमे २८ फेब्रुवारी व दोन मार्चला मॉडर्न हायस्कूलमधील उपकेंद्रावर होणार आहे. कला विभागाची उर्वरित सर्व विषयांची, तसेच विज्ञान, वाणिज्य व एमसीव्हीसी या विभागांच्या सर्व विषयांची परीक्षा डी. पी. भोसले महाविद्यालयातील मुख्य केंद्रावर होणार आहे. परीक्षेच्या बैठक व्यवस्थेचा तपशील सोमवारी (ता. २७) सायंकाळी चारला मुख्य केंद्रावर व उपकेंद्रावर प्रसिद्ध होणार असल्याचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी सांगितले आहे.